साप्ताहिक RNI NO : MAHMAR/ 2024/ 89870

# जय राष्ट्र
JAY RASHTRA

सांगली

EDITOR : SANGITA LAKHAN HONAMORE
E-mail : jayrashtranews@gmail.com
Mob : 9765222635, 9823882635
संपादक : संगीता लखन होनमोरे


❒ वर्ष : १ ❒ अंक : ३३ ❒ गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ ❒ पाने : ४ ❒ किंमत : ५ रुपये
❒ Year : 1 ❒ Issue : 33 ❒ Thursday 31 October 2024 ❒ Pages : 4 ❒ Price : 5 Rs.

# जत विधानसभा मतदारसंघ; स्थापनेपासून मंत्रिपदाचा दुष्काळ

## कायमस्वरूपी दुष्काळी जत तालुका मंत्रीपदापासून वंचित; यावेळी तरी मंत्रिपदाची संधी मिळेल का?

**जयराष्ट्र : वृत्तसेवा : जत /प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात सांगली जिल्ह्याने महत्त्वाची खाती मिळवून मोठा दबदबा निर्माण केला.असतानाही मात्र याच जिल्ह्यातील जत विधानसभा मतदारसंघ १९६२ ला स्थापना झाली. मंत्रिपदाला कायम वंचित राहिला आहे.मतदारसंघाला मंत्रिपदाची संधी असताना अनेक वेळा सत्तांतर होऊन विरोधी आमदार निवडून आला.त्यामुळे मंत्रिपद मिळाले







नाही. मतदारसंघाचा मंत्रिपदाचा दुष्काळ २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर संपणार का? याकडे लक्ष लागले आहे.

राज्यात शेवटचा कायमस्वरूपी दुष्काळी २८८-जत विधानसभा



मतदारसंघ आहे.१९६७ ते २००९ पर्यंत मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी हा मतदारसंघ राखीव होता.१९६२ व २००९ पासून हा मतदारसंघ सर्वसाधारण झाला आहे. तीन वेळा आमदारकी भूषविणाऱ्या उमाजीराव सनमडीकर यांची वसंतदादांचे निष्ठावान सहकारी म्हणून ओळख होती. त्यांनाही मंत्रिपद मिळाले नाही. सलग दोनवेळा निवडून आलेल्या एस टी बामणे, जयंत सोहनी यांनाही मिळाली नाही.मतदारसंघाला मंत्रिपदाची संधी असताना काँग्रेसचे उमाजी सनमडीकर यांचा २००४ ला पराभव झाला. तर २०१४ मध्ये भाजपचे विद्यमान आ. प्रकाश शेंडगे यांना उमेदवारी मिळाली नाही.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, ग्रामविकास मंत्री, जलसंपदामंत्री, सहकारमंत्री, समाजकल्याण मंत्री विधान परिषदेचे सभापतीपद यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळण्याची संधी जिल्ह्यातील विविध मतदारसंघाला मिळाली.मात्र कायमस्वरूपी दुष्काळी जत तालुका मंत्रीपदापासून वंचित आहे.

### जत विधानसभा मतदारसंघातील आमदार

१९६२-बॅरीस्टर टी के शेंडगे,१९६७ एस टी बामणे,१९७२-एस टी बामणे,१९७७-जयंत सोहनी,१९८०-जयंत सोहनी,१९८५,१९९० उमाजीराव सनमडीकर,१९९५- मधुकर कांबळे,१९९९-उमाजीराव सनमडीकर,२००४-सुरेश खाडे,२००९-प्रकाश शेंडगे,. २०१४-विलासराव जगताप, २०१९-विक्रम सावंत

### आ. विलासराव जगताप यांचीही संधी हुकली..

ज्येष्ठ नेते आमदार विलासराव जगताप यांना २०१४ मध्ये मंत्रिपदाची सर्वाधिक संधी होती.सिव्हील इंजिनिअर होते.२००४ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच जत विधानसभा मतदारसंघात कमळ फुलविण्याचे काम केले.२०१४ मध्ये सत्तांतर होऊन भाजप-शिवसेना युती सत्तेत आली.मंत्रीपदाच्या आशा उंचाविल्या होत्या.परंतु महायुतीच्या सत्तेतही त्यांना मंत्रिपदापासून वंचित राहावे लागले.

# मराठा आरक्षण सर्वेक्षण केले, पण मानधन नाही मिळाले

## जत तालुक्यातील ५७० प्रगणक कर्मचारी नऊ महिन्यापासून प्रतिक्षेत

**जयराष्ट्र वृत्तसेवा**
**दरीबडची : वार्ताहर**

जत तालुक्यात मराठा आरक्षण सर्वेक्षण फेब्रुवारी महिन्यात पूर्ण केले, पण प्रगणक कर्मचाऱ्यांना मानधन मिळाले नाही.शासनाने सर्वेक्षणाचे मानधन एप्रिल महिन्यात देऊन सुद्धा तहसील कार्यालय व शिक्षण विभागाच्या दुर्लक्षाने प्रगणकांना मानधन प्राप्त झालेले नाही.५७० प्रगणक कर्मचारी अद्यापही वंचित आहेत.याबाबत प्रगणकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार २४ ते ३१ जानेवारीमध्ये सर्वत्र मराठा सर्वेक्षणाचे काम युद्धपातळीवर करण्यात आले.सर्वेक्षण कामकाज सात दिवसांच्या आत पूर्ण करण्याची सक्ती कर्मचाऱ्यांना करण्यात आली होती. जिल्हा परिषद, पंचायत समिती कर्मचार, प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, शिक्षिका,ग्रामपंचायत कर्मचारी महसूल विभागाचे कर्मचारी सर्वेक्षणमध्ये सहभागी होते.

अवघ्या आठवडाभरात संपूर्ण गाव पिंजून काढत घर टू घर सर्वेक्षण करण्यात आले.मराठा कुटुंबासाठी तब्बल १५० प्रश्नावलींचा फॉर्म ऑनलाइन भरण्यात




शिक्षक भारती संघटनेने जिल्हाधिकारीकडे निवेदनव्दारे केली होते.त्यावेळी अनुदान जमा करण्याचे आश्वासन दिले होते.याबाबत राज्य मागास आयोगाकडे संघटना तक्रार करणार आहे.

**– दिगंबर सावंत**
**तालुका अध्यक्ष**
**शिक्षक भारती संघटना.**

आला.अन्य प्रवर्गासाठी १० प्रश्नांचा फॉर्म होता. इंटरनेटचा अभाव, शेतमळ्यातील प्रवास अशा सर्व समस्यांना तोंड देत युद्धस्तरावर सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

सर्वेक्षणासाठी मानधनाची कमाल मर्यादा १० हजार रुपये निश्चित केली होती. मराठा कुटुंबाच्या सर्वेक्षणासाठी १०० रुपये, तर इतरांच्या सर्वेक्षणासाठी १० रुपये मानधन होते. शिक्षकांनी निर्धारित वेळेपेक्षा अगोदरच सर्वेक्षण पूर्ण केले.आयोगाला सादर करण्यात आले.सर्वेक्षण पूर्ण होऊन दहा महिना झाला, पण मानधनाची अद्याप प्रतीक्षाच आहे.थोड्या प्रगणकांना मानधन मिळाले आहे.

नऊ महिन्यांपासून जवळपास लाख रुपये अडकून पडल्याने याला जबाबदार कोण, असा संतापजनक प्रश्न केला जात आहे.

**आता निवडणुकीचे कारण :–**

सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाली. त्यामुळे आचारसंहिता कारणाने कर्मचाऱ्यांना निवडणूक संपेपर्यंत प्रतीक्षेतच राहावे लागण्याची शक्यता आहे.

# जत पंचायत समितीत सरदार पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी साजरी

**जय राष्ट्र : जत प्रतिनिधी**

जत पंचायत समितीत भारताचे पहिले गृहमंत्री आणि पोलादी पुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दोन महान नेत्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण विस्तार अधिकारी अन्सार शेख यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणाने झाली. त्यांच्या या अभिवादनानंतर पंचायत समितीच्या कक्ष अधिकारी सौ. सुषमाताई मदने यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला आणि त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण केले. उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांनी या दोन महान नेत्यांना श्रद्धांजली अर्पण



करण्यासाठी पुष्प अर्पण केले. यावेळी सहाय्यक लेखा अधिकारी सिकंदर मकानदार, लेखा कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय कोकरे, कर्मचारी अविनाश कांबळे, अश्विनी मिसाळ, सौ. खरात, पाटबंधारे विभागाचे इम्रान मणेर, आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. बासरगावी हे प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेऊन देशाच्या एकतेसाठी योगदान देण्याचा संकल्प केला. कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे सांगली जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष आर. डी. कांबळे यांनी कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे आभार मानले.

सरदार पटेल यांच्या दृढ नेतृत्वाने देश एकसंध करण्याची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली, तर इंदिरा गांधी यांनी देशाच्या संरक्षणासाठी विविध कठोर निर्णय घेतले. या कार्यक्रमाने या दोन्ही नेत्यांच्या कार्याला उजाळा दिला आणि त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्याची संधी मिळाली.

# बाणूरगडला बहिर्जी नाईक स्मारक परिसरात दीपोत्सव

## संभाजी ब्रिगेडच्या उपक्रमास प्रतिसाद

**जय राष्ट्र : दरीबडची :**

किल्ले बाणूरगड (ता. खानापूर) येथे हिंदवी स्वराज्याचे गुप्तहेर प्रमुख व शिवरायांचे शिलेदार बहिर्जी नाईक यांच्या समाधी स्थळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने भव्य दीपोत्सव सोहळा उत्साहात झाला. यावेळी परिसर पणत्या, मशालीने उजळून गेला होता.

स्वराज्याच्या मावळ्यांनी दिलेल्या लढ्याची कृतज्ञतापूर्वक आठवण नेहमीच प्रेरणादायी आहे. शत्रूच्या प्रत्येक हालचाली बारकाईने व गनिमीकावा पद्धतीने स्वराज्याच्या उभारणीसाठी जीव ओवाळून टाकणारे बहिर्जी नाईक यांनी स्वराज्य अभेद्या ठेवले. त्यांच्या स्मारकस्थळी संभाजी ब्रिगेडच्या वत्तीने भव्य दीपोत्सव सोहळा साजरा केला जातो.

यावेळी ब्रिगेडचे



बहिर्जी नाईक यांच्यामुळे सुखाने जगतो त्यांच्या पवित्र अश्या बाणूरगड समाधी स्थळी आपल्या दिवाळी सणाचा पहिला दिवा लावून दिपोत्सव साजरा करण्यात आला. प्रत्येक वर्षी दिपोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.

**– श्रेयश नाईक**

जिल्हाध्यक्ष श्रेयस नाईक सोसायटीचे संचालक बापूसाहेब शिंदे ब्रिगेड जत तालुका सचिव बजीरंग शिंदे, बापुसो शिंदे,,शरद वाले,ॲड. मदन नाईक,,पाडुरंग शिंदे,संदिप नाईक,पाडुरंग देवकर,संजय मलमे,शिवाजी सरगर,प्रथमेश शिंदे,परमेश्वर कारंडे,संस्कार देवकर ,वेदांत नाईक ,प्रमोद मंडले व असंख्य शिवप्रेमी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींच्या ८, गडकरीच्या ४० तर योगींच्या १५ सभा; भाजपच्या झंझावाती प्रचाराला होणार सुरवात

**जय राष्ट्र : मुंबई :**

महाराष्ट्रात पुढील महिन्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. काल(२९ ऑक्टोबर २०२४) उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. आता राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे.

पंतप्रधान मोदी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मुंबई-कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात एकूण आठ सभा घेणार आहेत. तर, देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे राज्यात जास्तीत जास्त जाहीर सभा घेणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथदेखील महाराष्ट्रात एकूण १५ जाहीर सभा घेणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी – ८अमित शहा – २०नितीन गडकरी – ४०देवेंद्र गडकरी – ५०चंद्रशेखर बावनकुळे – ४०योगी आदित्यनाथ – १५



महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मिळून महाविकास आघाडी स्थापन केली. यावेळी महाराष्ट्र निवडणुकीत दोन आघाड्यांमध्ये प्रमुख लढत पाहायला मिळणार आहे. सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी आमनेसामने आहेत. महायुतीत भाजप, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच आहे.

महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होईल. गेल्या निवडणुकीत भाजपला १०५, शिवसेनेला ५६, राष्ट्रवादीला ५४ आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. मात्र, निवडणुकीनंतर शिवसेनेने एनडीएपासून फारकत घेत राष्ट्रवादी-काँग्रेससोबत सरकार स्थापन केले. शिवसेनेचे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले.

पुढे, जून २०२२ मध्ये शिवसेनेत अंतर्गत वाद निर्माण झाला होता आणि एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या ४० आमदारांसह बंड पुकारले. पुढे भाजपच्या पाठिंब्याने एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. तर, गेल्या वर्षी अजित पवारदेखील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करुन महायुतीत सामील झाले. आता शिवसेनेत दोन गट पडले आहेत. तर, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही शरद पवार आणि अजित पवार, असे दोन गट आहेत.

जय राष्ट्र हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक संगीता लखन होनमोरे यांनी मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून जय राष्ट्र कार्यालय मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली ४१६ ४१३ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

**संपादक : संगीता लखन होनमोरे**
**मोबा. ९७६५२२२६३५**

Printed And Published By On Behalf Of Sangita Lakhan Honamore And Printed At M/S. Kumbhojkar Offcet Printer's, 262, Mahaveer Nager, Sangli 416416 (Maharashtra) And Published At Jay Rashtra Karyalaya, A/P. Sonyal, Tal. Jath, Dist. Sangli, 416 413 (Maharashtra)
**Editor: Sangita Lakhan Honamore**
Mob.: 9765222635
**RNI No.: RNI NO : MAHMAR/ 2024/ 89870**

# जिल्ह्यातील ८ मतदारसंघात एकूण १९५ उमेदवारांची २४९ नामनिर्देशन पत्रे दाखल

## अखेरच्या दिवशी ११८ उमेदवारांची १२६ नामनिर्देशन पत्रे दाखल

**जय राष्ट्र : सांगली:**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ साठी नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी आज जिल्ह्यातील सर्व ८ मतदारसंघांतील ११८ उमेदवारांची एकूण १२६ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली. त्यामुळे आत्तापर्यंत एकूण १९५ उमेदवारांची २४९ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली. ही माहिती संबंधित मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.अखेरच्या दिवशी दाखल नामनिर्देशनपत्रांची माहिती पुढीलप्रमाणे., अनुक्रमे : विधानसभा मतदारसंघाचे नाव, नामनिर्देशनपत्र दाखल संख्या, नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या व्यक्तिचे नाव व पक्ष, २८१–मिरज (अ.जा.)–२०–**, प्रशांत लक्ष्मण सदामते (जनहीत लोकशाही पार्टी), उत्तमराव संपत कांबळे (अपक्ष), चंद्रकांत रावसाहेब सरवदे (अपक्ष) , विज्ञान प्रकाश माने (वंचित बहुजन आघाडी), चंद्रकांत रामचंद्र सांगलीकर (अपक्ष), अमीत हरी कांबळे(अपक्ष) , संतोष मधुकर पोखरनीकर (अपक्ष) , अनील देवदान मोहिते (अपक्ष) , तानाजी आनंदा सातपुते (शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)) , डॉ.सुरेश (भाऊ) दगडू खाडे (अपक्ष) , सुमन सुरेश खाडे (भारतीय जनता पार्टी) , धनराज अनील सातपुते (अपक्ष) , जैनाब शकीलअहमद पिरजादे (अपक्ष), प्रा.लक्ष्मण बापू मोरे (अपक्ष) , बाळासाहेब दत्तात्रय होनमोरे (अपक्ष) , नंदादेवी बाबूराव कोलप (अपक्ष) , सदाशिव सिध्दू कांबळे (अपक्ष) , शशिकांत भगवान बनसोडे (अपक्ष) , अरुण अकाराम धोत्रे (अपक्ष) , राजरत्न अशोक आंबेडकर (अपक्ष) , **२८२–सांगली–१९–** , मिनाक्षी विलास शेवाळे (अपक्ष) , अल्लाऊद्दीन हयातचाँद काजी (वंचित बहुजन आघाडी), आरती सर्जेराव कांबळे (बहुजन समाज पार्टी), हरिदास श्रीमंत पडळकर (अपक्ष), प्रकाश आप्पासाहेब बिरजे (भारतीय जनता पार्टी) , मिलिंद विष्णू साबळे (अपक्ष), शिवाजी राजाराम डोंगरे (अपक्ष), जयश्री मदन पाटील (अपक्ष), समीर अहमद सय्यद (अपक्ष) , डॉ. संजय महादेव पाटील (अपक्ष) , आसिफ नबीलाल बावा (अपक्ष) , महादेव ज्ञानोबा साळुंखे (अपक्ष) , जयश्री मदन पाटील (अपक्ष) , विरेंद्रसिंह पृथ्वीराज पाटील (इंडियन नॅशनल काँग्रेस) , मयुरेश सिधार्त भिसे (अपक्ष) , जयश्री अशोक पाटील (अपक्ष) , राजेंद्र नाथा कांबळे (अपक्ष), उत्तमराव जिन्नाप्पा मोहिते (अपक्ष) , सतिश भुपाल सनदी (राष्ट्रीय समाज पक्ष), **२८३–इस्लामपूर– १५**, निशिकांत प्रकाश पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी) , राजेश शिवाजी गायगवाळे (वंचित बहुजन आघाडी) , जयंत रामचंद्र पाटील (अपक्ष) , हणमंत विलासराव पाटील (अपक्ष) , जयंत राजाराम पाटील (अपक्ष) , बाबासाहेब गणपती पाटील (अपक्ष) , निशिकांत दिलीप पाटील (अपक्ष) , निशिकांत प्रल्हाद पाटील (अपक्ष) , दत्तात्रय भाऊ गावडे (अपक्ष) , अमोल विलास कांबळे (बहुजन समाज पार्टी), विनायक हौसेराव शेवाळे (अपक्ष) , चंद्रशेखर प्रकाश तांदळे (अपक्ष) , सतीश शिवाजी इदाते (राष्ट्रीय समाज पक्ष), दिग्विजय दिनकर पाटील (अपक्ष), सागर हणमंतराव गुरव–मलगुंडे (अपक्ष), **२८४–शिराळा– ११**, जितेंद्र शिवाजीराव देशमुख (अपक्ष), निवास पांडुरंग पाटील (अपक्ष), आनंदराव वसंतराव सरनाईक (फौजी बापू) (संभाजी ब्रिगेड पार्टी) , आनंदराव वसंतराव सरनाईक (फौजी बापू) (अपक्ष) , तानाजी महादू पाटील (अपक्ष), प्रविण भिमराव पाटील (अपक्ष), विराज मानसिंग नाईक (अपक्ष), मानसिंग फत्तेसिंगराव नाईक (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार) , मानसिंग फत्तेसिंगराव नाईक (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार) , मानसिंग ईश्वरा नाईक (अपक्ष) , मुजावर गौस बाबासो (बहुजन समाज पार्टी), **२८५–पलूस–कडेगाव– ०९**, जयसिंग बापूसो थोरात (अपक्ष) , हणमंत गणपती होलमुखे (अपक्ष) , विशाल तुकाराम पाटील (अपक्ष) , अंकुश वसंत पाटील (जनहित लोकशाही पार्टी), महादेव रामचंद्र होवाळ (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)) , विश्वनाथ शिवराम कांबळे (अपक्ष) , जीवन किसन करकटे (वंचित बहुजन आघाडी) , प्रमोद यशवंत जाधव (रिपब्लिकन बहुजन सेना), अशोक रामचंद्र चौगुले (अपक्ष), **२८६–खानापूर–२१**, अमोल अनिलराव बाबर (अपक्ष), मोहन सोनू बागल (अपक्ष), नाथजीराव उर्फ राजेंद्र रस्तुम देशमुख (अपक्ष) , भक्तराज रघुनाथ ठिगळे (प्रहर जनशक्ती पक्ष) , भक्तराज रघुनाथ ठिगळे (अपक्ष) , भक्तराज रघुनाथ ठिगळे (प्रहर जनशक्ती पक्ष) , उमाजी मोहन चव्हाण (राष्ट्रीय समाज पक्ष) , डॉ.उन्मेश गणपतराव देशमुख (अपक्ष) , नारायण पांडुरंग खरजे (जनहित लोकशाही पार्टी), गणेश तुकाराम जुगदर (अपक्ष) , दादासो कोंडीराम चंदनशिवे (अपक्ष) , संदिप गंगाधर लोंढे (भारतीय रिपब्लिकन पक्ष (अ), सचिन दिलीप गुरव (अपक्ष) , उत्तम शामराव जाधव (अपक्ष) , राजेश रामचंद्र जाधव (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), संभाजी जगन्नाथ पाटील (अपक्ष) , दादासो पोपट घाडगे (अपक्ष) , रणजित सर्जेराव पवार (अपक्ष) , प्रल्हाद हैबती गुजले (रिपब्लिकन बहूजन सेना), सुहास राजेंद्र बाबर (अपक्ष), अंकुश महादेव चवरे (अपक्ष), **२८७–तासगाव–कवठेमहांकाळ–२६**, रोहित राजेंद्र पाटील (अपक्ष) , रोहित राजगोंडा पाटील (अपक्ष) , रोहित रावसाहेब पाटील (अपक्ष) , संजय रामचंद्र पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी) , संजय रामचंद्र पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी), संजय रामचंद्र पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी), प्रकाश तुकाराम शिंगाडे (अपक्ष) , अर्जुन बबन थोरात (अपक्ष), सचिन मनोहर वाघमारे (अपक्ष) , सुनिल बाबुराव लोहार (अपक्ष) , शंकर मार्तंड माने (बहुजन समाज पार्टी) , नानासो आनंदराव शिंदे (अपक्ष) , दिगंबर रामचंद्र कांबळे (शेतकरी कामगार पक्ष) , दत्तात्रय बंडू आठवले (वंचित बहुजन आघाडी) , प्रशांत लक्ष्मण सदामते (अपक्ष) , शिवाजी हरिच्छद्र ओलेकर (राष्ट्रीय समाज पक्ष) , विजय श्रीरंग यादव (अपक्ष) , कृष्णदेव पांडुरंग बाबर (अपक्ष), संजय गोविंदराव चव्हाण (अपक्ष), महादेव भिमराव दोडमणी (अपक्ष), सुमन रावसो पाटील (अपक्ष), घागरे युवराज चंद्रकांत (बहुजन महापार्टी) , विराजसंजय पानसे (अपक्ष) , शशिकांत दर्योधन कोळेकर (जनहित लोकशाही पार्टी), संभाजी दत्तात्रय माळी (अपक्ष) , संभाजी दत्तात्रय माळी (राष्ट्रीय काँग्रेस आय), **२८८–जत–० ५**, सुरेश बाबूराव शिंदे (अपक्ष) , विजय अंबुराया बागेळी (अपक्ष) , दत्तात्रय शंकर भुसनर (अपक्ष) , महादेव मेगु पवार (अपक्ष), आण्णासो शिवाजी टेंगले (अपक्ष)



# संपादकीय

## संघाची शंभरी

राष्ट्रभक्ती, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार आणि नि:स्वार्थ समाजसेवा याच ध्येयाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. गेल्या शंभर वर्षांच्या काळात या संघटनेने आपला मूळ ध्येयवाद, उद्देश आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत कार्याचा चौफेर विस्तार केला; पण पूर्ण स्वावलंबी, शक्तिशाली, आत्मनिर्भर राष्ट्रनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या कोट्यवधी समर्पित स्वयंसेवकांची फळीही निर्माण केली. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रभक्ती, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार आणि नि:स्वार्थ समाजसेवा याच ध्येयाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. गेल्या शंभर वर्षांच्या काळात या संघटनेने आपला मूळ ध्येयवाद, उद्देश आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत कार्याचा चौफेर विस्तार केला; पण पूर्ण स्वावलंबी, शक्तिशाली, आत्मनिर्भर राष्ट्रनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या कोट्यवधी समर्पित स्वयंसेवकांची फळीही निर्माण केली. संपूर्ण देशात राष्ट्राभिमानाच्या जागृतीबरोबरच भारताला मातृभूमी मानणारे सर्व हिंदू हे भारतीय अशी हिंदुत्वाची व्यापक भूमिका घेत वर्ण, जातिभेदविरहीत एकजूट करत हिंदू समाजनिर्मितीसाठी विचारप्रबोधनही केले. सांस्कृतिक संघटनेने आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सुरू केलेल्या संघ परिवारातल्या भारतीय किसान संघ, सेवाभारती, संस्कृतभारती, स्वदेशी जागरण मंच, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्रसेविका समिती, संस्कार भारती अशा विविध संस्थांद्वारे संस्कृती संवर्धनाबरोबरच गेली हजारो वर्षे उपेक्षित आणि वंचित राहिलेल्या कोट्यवधी आदिवासींना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठीही समर्पितपणे कार्य केले. कोणत्याही मोहमयी पदाची अपेक्षा न ठेवता संघाच्या राष्ट्रीय विचारसरणीनुसार एक कोटीच्या आसपास स्वयंसेवक कार्य करतात. अशाच प्रकारे कार्य करणाऱ्या कोणत्याही संघटनांपेक्षा हे नक्कीच उजवे असे चित्र आहे. संघटनेचे सुमारे पन्नास हजार प्रचारक येथे राष्ट्रसेवेला आपले जीवन अखंडपणे अर्पण करत असतात. त्यांना ना पैशाची अपेक्षा असते ना घरदाराची. आपल्यामागे असलेल्या घराची व्यवस्था कोणी लावून दिली, तर हे कार्यकर्ते अगदी मणिपूर, मेघालय, आसामसारख्या दूरस्थ असलेल्या प्रदेशात जोखमीचे काम करत असतात.

संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर लावलेल्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे, पण साऱ्या जगभरात या वटवृक्षाच्या फांद्या आणि पारंब्यांचा विस्तारही झाला आहे. काळानुसार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संघ परिवाराशी संलग्न विविध संस्थांची स्थापना केली आणि या संस्थांनीही समाजसेवेचा नवा मानदंड निर्माण केला. भूकंप, महापूर यांसह विविध नैसर्गिक आपत्तीच्या संकटातही संघाचे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते धावून जातात आणि आपत्तीग्रस्तांना नि:स्वार्थपणे सहाय्य करतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही फॅसिस्ट, कडवे हिंदुत्वनिष्ठ आणि प्रतिगामी विचारांची, मनुवादाचे म्हणजेच जातीय वर्णवादाचे समर्थन करणारी संघटना असल्याची टीका या वाटचालीमध्ये सातत्याने होत असली तरी प्रत्यक्षात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवाराच्या संस्थांनी जातीभेदविरहित एकजुटीनेच समाजसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. चारित्र्य, शीलसंवर्धनाचे प्रशिक्षण देत भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्यांचा आदर्श जपत संघाने सामाजिक कार्याचा विस्तार करतानाच धर्मांध मुस्लीम आणि धर्मवेड्या ख्रिश्चन शक्तींना कडाडून विरोध केला आहे. भारतात आदर्श आणि चारित्र्यशील पिढ्या घडाव्यात, यासाठीच गेली शंभर वर्षे संघाचे हे सामाजिक आणि राष्ट्रसेवेचे कार्य अखंड सुरू आहे.

प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राजकारणात सक्रिय सहभाग घ्यायचा नाही, हे धोरण स्वीकारले आणि ते अमलातही आणले. पण, स्वातंत्र्य मिळाल्यावर संसदीय लोकशाहीत तेव्हाच्या प्रबळ काँग्रेस पक्षाला प्रबळ ठरणारा राजकीय पर्याय असावा, ही विचारसरणी माजी सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांनी स्वीकारली आणि प्रखर राष्ट्रवादी, हिंदुत्ववादी आणि बलशाली राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या राजकीय पक्षाच्या स्थापनेला मान्यता दिली आणि या नव्या पक्षाच्या व्यापक संघटन कार्यासाठी संघाचे समर्पित कार्यकर्ते ही नव्या पक्षाला दिले.

# बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ कधीपर्यंत भरता येणार अर्ज?

**जय राष्ट्र : पुणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फब्रुवारी–मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ३१ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर १५ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे.
राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. बारावीच्या नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज सरल प्रणालीद्वारे ऑनलाइन पद्धतीने भरायचे आहेत. तर व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणारे विद्यार्थी, आयटीआयचे विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रचलित पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयातर्फे भरायचे आहेत. त्यासाठी ३० ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र आता अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या आणि प्रीलिस्ट २७ नोव्हेंबरपर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करायच्या असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

खासगी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत
राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत खासगी विद्यार्थ्यांना अतिविलंब शुल्काद्वारे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. खासगी विद्यार्थ्यांना वीस रुपये प्रति दिन या दराने अतिविलंब शुल्क भरावे लागणार असून, ३१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ऑनलाइन अर्ज भरता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षणाच्या बाहेर राहिलेल्या, पण किमान पाचवी उत्तीर्ण असलेल्या मुला–मुलींना खासगीरित्या दहावी–बारावीची परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# सावधान ! सोशल मीडिया पोस्टवर आयोगाची नजर

## आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांविरोधात होणार गुन्हा दाखल, उमेदवारालाही बंधने

**जय राष्ट्र : वृत्तसेवा**

**मुंबई :** निवडणूक काळात समाजमाध्यमांवर पक्षाचा अथवा उमेदवारांचा प्रचार करताना सावधगिरी बाळगावी लागणार आहे. फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, गुगल, शेअरचॅट, टिकटॉक, बिग टीव्ही यासारख्या सोशल मीडियावर आचारसंहिता काळात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर निवडणूक आयोगाची करडी नजर असणार आहे. अशी पोस्ट करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी लोकमतला दिली.

लोकसभा निवडणूक काळात सोशल मीडियालाही आचारसंहिता लागू करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला होता. तोच निर्णय विधानसभा निवडणुकीतही कायम ठेवण्यात आला आहे. खोटी माहिती देणे, अफवा पसरवणे, सोशल मीडियावर चुकीच्या पद्धतीने माहिती पोस्ट करणे इत्यादी प्रकार केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. समाजमाध्यमांचा चुकीचा वापर करू नये, असे आवाहन आयोगाने केले आहे.



### उमेदवारांसाठी परवानगी आवश्यक

उमेदवाराने समाजमाध्यमांसाठी खासगी कंपनीची नियुक्ती केली असल्यास त्याची माहिती अर्जासोबत द्यावी लागणार आहे. बल्क एसएमएस पाठविण्यासाठी उमेदवारांना पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीच्या परवानगीशिवाय व्हिडीओ आणि ऑडिओ प्रचार करता येणार नाही. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची माहितीही समितीला द्यावी लागणार आहे.

| समाजमाध्यम | आक्षेपार्ह पोस्ट | हटवलेल्या पोस्ट | कारवाई प्रलंबित |
|---|---|---|---|
| फेसबुक | १४३ | १६ | १२७ |
| इंस्टाग्राम | २८० | २९ | २५१ |
| ट्विटर | १२९६ | २५१ | १०४५ |
| यूट्यूब | ३१ | ५ | २६ |
| इतर | २ | २ | ० |
| एकूण | १७५२ | ३०३ | १४४९ |

### दंड किती?

- सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारा मजकूर, फोटो पोस्ट करू नयेत. देशाची एकता-सार्वभौमत्व आदींचे नुकसान करणारा, कोणत्याही संप्रदाय विरोधातला मजकूर, अफवा पसरविणारा, जीवे मारण्याची धमकी देणारा, अश्लील कंटेंट, चाइल्ड पोर्नोग्राफी आदी पोस्ट करणारा आणि ती पोस्ट शेअर करणारा अशा दोघांनाही दोषी ठरविले जाते.
- यापैकी काही गुन्ह्यांसाठी तुरुंगवास, सायबर क्राइमसाठी ३ वर्षे ते आजीवन कारावास तसेच एक लाख ते १० लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो.

- नोडल ऑफिसर यांना कलम ७९(३)(बी) अन्वये सोशल मीडियावर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह पोस्ट आणि व्हिडिओ काढून टाकण्यासाठी नोटीस निवडणूक आयोगाने पाठविली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

# २८८ मतदारसंघात इतक्या उमेदवारांचे अर्ज

जय राष्ट्र : मुंबई–
लाईव्ह ट्रेंडस न्यूज वृत्तसेवा

महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. २८८ मतदारसंघात तब्बल ७९९५ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत.

उद्या या अर्जांची छाननी होणार असून, चार तारखेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. शेवटच्या दिवशी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे पाटील, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले माजी मंत्री नवाब मलिक, माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा यांच्यासह अनेक दिग्गजांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. महाविकास आघाडी व महायुतीतील सर्वच पक्षात अनेक ठिकाणी बंडखोरी झाली असून, पुढील दोन, तीन दिवस बंडोबांना थंड करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागणार आहे. याबरोबरच आघाडीतील घटकपक्षांनी पाच ठिकाणी परस्परांविरुद्ध उमेदवार उभे केले आहेत, तर महायुतीत तीन, चार ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. २८८ मतदारसंघात एकूण ७९९५ उमेदवारांचे १०९०५ अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती रात्री उशिरा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. उद्या ३० ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होईल व ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल.



शेवटच्या दिवशी काही दिग्गज नेत्यांसह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. २०१९ च्या निवडणुकीत उमेदवारी नाकारलेल्या भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना यावेळी पक्षाने उमेदवारी दिली आहे. आज त्यांनी कामठी मतदारसंघात अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोली विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. तर वरळी विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे आणि शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार मिलिंद देवरा यांनी आदित्य ठाकरेंच्या विरोधात अर्ज दाखल केला.

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज भरला. संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर पश्चिममधून, भाजपाच्या हेमंत रासने यांनी पुण्याच्या कसबा पेठ मतदारसंघातून, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील टिंगरे यांनी वडगांव शेरीतून उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेसचे गोपाल अग्रवाल यांनी गोदिया विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. धुळे शहर मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल गोटे यांनी, तसंच एमआयएमचे फारुख शाह यांनी, काँग्रेसचे विकास ठाकरे यांनी नागपूर पश्चिमधून, श्वेता महाले यांनी चिखलीतून, शिवसेनेचे दीपक केसरकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन तेली यांनी सावंतवाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. बेलापूरमधून भाजपाच्या मंदा म्हात्रे, दिंडोशीतून संजय निरुपम, रत्नागिरी मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाळ माने, तासगाव–कवठे महांकाळमधून संजय पाटील, महाड मधून भरत गोगावले आणि नागपूर उत्तर मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

# राज्यात बंडखोर टेन्शन वाढवणार! महायुती–मविआचे १५० बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात



**जय राष्ट्र : मुंबई :**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. महायुती आणि महाविकास आघाडीत जागा वाटपांचा तिढा कायम असताना दुसरीकडे या दोन्ही आघाड्यांमध्ये तिढा निर्माण झाल्याचे दिसून येते.

राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांचेही जवळपास १५० बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विधानसभा निवडणुकीच्या लढतीचे अंतिम चित्र हे ४ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होईल.

विधानसभा निवडणुकांसाठी अर्ज दाखल करण्यासाठी २९ ऑक्टोबरही मुदत होती. ही मुदत संपेपर्यंत नाट्यमय घडामोडी घडल्या. काही ठिकाणी आपल्या मित्रपक्षाच्या उमेदवाराविरोधात उमेदवार उतरवण्यात आला. शेवटच्या क्षणी काही उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले. त्याशिवाय, इच्छुक नाराज उमेदवारांनीदेखील बंड करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**बंडखोर वाढवणार टेन्शन...**

राज्यातील प्रमुख दोन आघाडींसाठी ही बंडखोरी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. महायुतीमध्ये जवळपास ८० ठिकाणी बंडखोर उभे करण्यात आल्याचे चित्र आहे. निवडणुकीचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठीची शेवटची तारीख ही ४ नोव्हेंबर आहे. या दरम्यानच्या कालावधीत बंडोबांना थंड करण्याचे जोरदार प्रयत्न होणार आहेत. युती–आघाड्यांमध्येही याच कालावधीत चर्चेची दुसरी फेरी होण्याची शक्यता असून काही ठिकाणचे उमेदवार मागे घेतले जाण्याची शक्यता आहे.

महायुती, महाविकास आघाडीकडून किती उमेदवार?

निवडणूक अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे १०३, शिवसेना ठाकरे गट ९६, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून ८७ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. महाविकास आघाडीने आपल्या मित्रपक्षांना हाताच्या बोटावर मोजण्या इतपत जागा सोडल्या. त्यामुळे मविआवर मित्रपक्ष नाराज आहेत. तर महायुतीकडून २८६ जागांवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये भाजप १५२, शिवसेना ८० आणि राष्ट्रवादी ५२ अशी उमेदवारांची संख्या आहे.

महायुतीतील घटक पक्षांकडून काही मतदारसंघात दोन उमेदवार जाहीर केले आहेत. तर, दोन जागांवर एकही उमेदवार नाही. महायुतीने २८६ जागांवर २८९ उमेदवार उभे केले आहेत. तीन जागांवर महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

# नववी, दहावी अभ्यासक्रमात आणखी तीन विषयांची भर

## शेती, नळ दुरुस्ती, बागकाम, सुतारकामाचा समावेश

**जय राष्ट्र : वृत्तसेवा**

**मुंबई** : शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरच्या ओझ्याचा प्रश्न अद्याप अनुत्तरित असताना आता ते कमी होण्याऐवजी आणखी वाढणार आहे. कारण नववी, दहावी अभ्यासक्रमाच्या सात विषयांत अतिरिक्त तीन विषयांची भर पडणार आहे. या अतिरिक्त विषयांमुळे शाळांच्या वेळाही वाढवण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेबसाइटवर याबाबतची ब्लू प्रिंट देण्यात आली आहे.

सध्या नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना ७ ते ८ विषय आहेत; परंतु आता आराखड्यात बदल करण्यात आला आहे. त्यात अजून व्यावसायिक शिक्षण, कला शिक्षण, अंतर्गत विद्या शाखा विषय बंधनकारक असणार आहेत, तसेच तीन भाषा, विज्ञान, गणित, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि नव्याने सामील केलेले हे तीन विषय असे दहा विषय असणार आहेत, तसेच स्काउट गाइडदेखील बंधनकारक आहे.

### काय होणार?

■ नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांचा समावेश सक्तीचा केला आहे. शाळांकडून सूचना आल्यानंतरच अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.



■ **व्यावसायिक शिक्षणामध्ये नववीसाठी विद्यार्थ्यांना शेती, नळ दुरुस्ती, सौंदर्य या व्यवसायांची ओळख करून देण्यात येणार आहे.**

■ दहावीला बागकाम, सुतारकाम परिचय यासारख्या व्यवसायांची माहिती देण्यात आली आहे.

■ **कला शिक्षणातून दृश्यकला, नाट्य, संगीत, नृत्य, लोककला हे विषय शिकवण्यात येणार आहेत.**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली शाळेचे विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत घवघवीत यश

**सर्वच तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये पंढरपूर तालुक्यात जळोली शाळेचे वर्चस्व**

**समूहगीत,समूहनृत्य कथाकथन,निबंधलेखन वक्तृत्व या सर्व स्पर्धांमध्ये पटकावले नंबर**





**जय राष्ट्र : करकंब:**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मधील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी जिल्हा परिषद सोलापूर आयोजित पंढरपूर पंचायत समिती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली शाळेने घवघवीत यश संपादन करत पंढरपूर तालुक्यात आपले वर्चस्व प्रस्थापित केले असून वैयक्तिक स्पर्धेत त्यामध्ये कथाकथन लहानगट स्पर्धेत कु श्रेया महादेव नरसाळे तर मोठा गट सायली शिंदे हिने द्वितीय क्रमांक पटकावला निबंध स्पर्धेत मोठा गट कु उपासना अमोल नरसाळे हिचा द्वितीय तर वक्तृत्व स्पर्धेत मोठा गट द्वितीय क्रमांक स्वरांजली सुनिल नरसाळे मिळवत सामुहिक स्पर्धेमध्ये सुध्दा मोठ्या गटात समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम तर लोकनृत्य मोठा गटात द्वितीय क्रमांक मिळवत समूहगीतात निबंध.वक्तृत्व. कथाकथन.यामध्ये सोलापूर जिल्हास्तरीय होणाऱ्या स्पर्धेत निवड झाली असून पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली शाळेने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. व्यक्तिमत्व विकासाबरोबरच गुणवत्ता ही तितकीच उत्तम असून सर्व शिक्षक एकदिलाने काम करत आहेत.लवकरच क्रिडा स्पर्धेचीही तयारी सुरू केली आहे.खरोखरच हे यश पाहता विद्यार्थीनां श्रीमती देवकी कलढोणे-दुधाणे मॅडम यांचे अथक परिश्रम व अनमोल मार्गदर्शन लाभले. पंढरपुर तालुका पंचायत समिती कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब,स्पर्धा केंद्रप्रमुख काळुंके साहेब केंद्रप्रमुख पा.वा.जाधव साहेब.जळोली गावाचे मा.सरपंच.जोतिराम मदने,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब नरसाळे.उपाध्यक्ष शहाजी नरसाळे.स्थानिक संस्था प्रतिनिधी समाधान काका नरसाळे, ज्येष्ट नेते कांतिलाल नरसाळे,संतोष नरसाळे.सर्व ग्रामस्त,माता पालक यांनी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी आणि शिक्षकांचे अभिनंदन करत जिल्हा स्तरीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.हे यश प्राप्त करण्यासाठी मुख्याध्यापक गणपत मोरे सर.सोमनाथ पवार सर.रमेश खारे सर.अभिमन्यू लोंढे सर.शिवाजु गोरे सर.कैलास नरसाळे सर.जयवंत कापसे देवकी कलढोणे -दुधाणे मॅडम यांनी अधिक परिश्रम घेतले.

# जि.प. प्राथ. शाळा वाफळकरवस्ती (केंद्र पांढरेवाडी) शाळेचा तालुकास्तरीय समुहगीत गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक



## प्रयत्नांती परमेश्वर...
## महिनाभराच्या कष्टाचं फळ मिळालं..

**जय राष्ट्र : करकंब:**

जल्हा परिषद सोलापूर यांचे वतीने आयोजित विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पंढरपूर तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थी गुणवत्ता विकास शोध चाचणी मध्ये ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाफळकरवस्ती (बार्डी)केंद्र पांढरेवाडी शाळेचा तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावत यश प्राप्त केले.या स्पर्धेत मध्ये मूल्यशिक्षण गीत सुबह सबेरे लेकरं तेरा नाम हे सुंदर प्रार्थनागीत सादर केले.पंढरपूर तालुक्यातील १५ समुहगीत संघातून निवड झाल्याबद्दल विशेष कौतुक होत आहे.विविध उपक्रम राबविली जाणारी वाफळकरवस्ती शाळेचे पहिल्यांदाच मिळालेले हे यश छोट्याशा शाळेला आनंददायी आहे.हे यश मिळण्यासाठी वाफळकरवस्ती शाळेचे सह शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी विशेष परिश्रम घेत मुख्याध्यापक किरण ढोबळे.अध्यक्ष रामदास माळी उपाध्यक्ष प्रवीण कवडे तसेच हार्मोनियम साथ अरुण माळी यांनी सहकार्य केले. गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब तुंगत केंद्राचे केंद्रप्रमुख काळुंके साहेब.पांढरेवाडी केंद्रप्रमुख स्वाती डोंगरे मॅडम तुंगत केंद्रीय मुख्याध्यापक नागणे सर तसेच अभिजित उपसरपंच भैय्या कवडे. ज्ञानेश्वर वसेकर .सर्व पालक पांढरेवाडी केंद्रातील शिक्षक शिक्षिका यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.परीक्षक म्हणून संगीत शिक्षिका स्वानंदी काणे.धनंजय रोंगे.आणि चिंतामणी दामोदरे यांनी काम पाहिले.



# शासकीय कर्मचाऱ्यांनी हेल्मेट वापरणे आता नविन आदेशाने बंधनकारक

## विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार नियमाचाभंग करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

## सेवा पुस्तकातही होणार नोंद

**जय राष्ट्र : पुणे :**

पुणे विभागातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, महाविद्यालये तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई; सेवा पुस्तकातही होणार नोंद आले असून याचे पालन सर्व संबधितांनी करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत.

नियमभंग करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर संबंधित प्राधिकरणाने दंडात्मक कारवाई करुन त्यांच्या सेवा पुस्तकातही कारवाईची नोंद घ्यावी, अशा सूचनादेखील त्यांनी दिल्या आहेत. यासंबंधीचे परिपत्रक डॉ. पुलकुंडवार यांनी जारी केले आहे.

मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १२९ नुसार तसेच मे.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार दुचाकी चालविणाऱ्या तसेच दुचाकीवर पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट परिधान करणे बंधनकारक आहे. मोटार वाहन कायद्यातील तरतूदींचे पालन करणे प्रत्येक शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र नागरी सेवा, १९८९ (शिस्त व अपील) मधील नियम ३ (१) च्या पोटनियम १८ व कलम १९ मध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोणत्याही कायद्याच्या, नियमांच्या, विनियमांच्या आणि प्रस्थापित प्रथेच्या विरुद्ध आहे किंवा असू शकते असे कोणतेही कृत्य करता येणार नाही असे नमूद आहे. त्यांचे कर्तव्य पार पाडताना



शिस्त राखील आणि त्याला यथोचितरित्या कळविण्यात आलेल्या कायदेशीर आदेशांचे पालन करण्यास जबाबदार असेल अशी तरतूद असून ती सर्वांना बंधनकारक आहे. हेल्मेटचा वापर न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) मधील तरतुदीनुसार संबंधित कार्यालय प्रमुखांनी शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यामार्फत दंड वसूलीची कार्यवाही करावी. तसेचयाचीनोंदमूळसेवापुस्तकात घेण्याची कार्यवाही करावी,

असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. जीवन अमूल्य असून प्रत्येक जीव वाचवणे महत्वाचे आहे हे तत्त्व लक्षात घेवून सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रस्ते अपघात कमी होण्याच्यादृष्टीने स्वतः पासून सुरुवात करावी तसेच या यानुषंगाने घ्यावयाची दक्षता व करावयाच्या उपाययोजना म्हणून हेल्मेट वापरावे असे आवाहन परिपत्रकाद्वारे करण्यात आले आहे. मे.सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती अभय सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे पुणे शहर तसेच जिल्हा व विभागातील रस्ते अपघात व पर्यायाने होणारे मृत्यू कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीत भारतात व महाराष्ट्रात रस्ते अपघातात दुचाकी वाहनचालकांच्या बळींची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. दुचाकी अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या लक्षणीय आहे.

दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर केल्यास अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येमध्ये निश्चित घट होऊ शकते असे निदर्शनास आणून देण्यात आले. याची दखल घेऊन वाहनचालकाने स्वतः आणि सोबत बसलेल्या व्यक्तीने रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणाऱ्या हेल्मेटचा वापर करावा, त्यासाठी प्रशासनाने दुचाकी वाहनचालकांसाठी हेल्मेट वापराची सक्ती करावी व वाहतूक नियमांबाबत जनजागृती करावी, अशा सक्त सूचना न्यायमूती श्री. सप्रे यांनी दिल्या आहेत, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.








# राज्यातील हवामानात सुखद बदल; गुलाबी थंडीची चाहूल

**जय राष्ट्र : मुंबई–**



राज्यातील हवामानात मोठा बदल झाला आहे. पावसानंतर आता थंडीची चाहूल लागली आहे. बहुतांश काही भागात तापमानात मोठी घट नोंदवण्यात आली आहे. हळूहळू किमान तापमानात घट होऊ लागली आहे. त्यामुळे राज्यात गुलाबी थंडीची चाहूल लागली आहे. वादळी पावसाने उघडीप देताच थंडीची चाहूल लागली आहे. मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात घट झाल्याने सकाळी हवेत गारवा आला असून, धुक्यासह दव पडल्याचे चित्र दिसून येत आहे. सकाळी गारठा वाढू लागला असतानाच, दुपारच्या वेळी उन्हाचा चटका तापदायक ठरत आहे. नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला तापमानात काहीशी घट होणार असून, उत्तर आणि मध्य महाराष्ट्रात गुलाबी थंडीची चाहूल लागणार आहे. तिथं देशाच्या उत्तरेकडील राज्यांमधूनही पावसानं केव्हाचीच माघार घेतली असून, आता तापमानत घट होण्यास सुरुवात झाली आहे. हिमालयावरून येणाऱ्या शीतलहरींनी आता वेग धारण करण्यास सुरुवात केल्यामुळं हवेत गारठा जाणवू लागला आहे.

वादळी पाऊस थांबताच राज्यात आकाश निरभ्र होत, स्वच्छ सूर्यप्रकाश जमिनीवर आल्याने उन्हाचा चटका वाढल्याचे दिसून येत आहे. यातच पहाटेच्या वेळी हवेत गारठा वाढू लागला आहे. पावसाने माघार घेतल्यानंतर राज्यात तापमानात गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली होती. पण थंडीची चाहूल लागल्यानंतर किमान तापमानामध्ये घट झाल्याचे पाहायला मिळणार आहे. दिवळीनंतर राज्यात थंडीची हुडहुडी भरेल. दिवाळीमध्ये पाऊस पूर्णपणे माघार गेलेला असेल अन् राज्यात थंडीची चादर पसरलेली दिसेल. राज्यात एक नोव्हेंबरपासून खऱ्या अर्थाने थंडीला सुरुवात होईल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

